# Pimpri Chinchwad Police Commissionerate

## प्रेस नोट दिनांक २४/०८/२०२१

## चाकण एमआयडीसी येथील नांमाकित कंपनीतील अपहरण व खंडीणीचे गुन्हयातील आरोपीस पिंपरी चिंचवड गुन्हे शाखा युनिट-३ चे पथकाकडून गजाआड

दिनांक २३/०८/२०२१ रोजी मौजे म्हांळुगे गावचे हददीत एचपीसीएल कंपनी एचपीचौक येथे फिर्यादी नामे शिवाजी नरसु पाटील वय-५६ वर्षे धंदा- नोकरी रा.म्हाळुंगे ता.खेड जि.पुणे यास म्हांळुगे गावचे हददीत एचपीसील कंपनीचे गेट समोर अनोळखी इसमाने फोन करुन तुमच्याशी कॅटीन संदर्भात बोलायचे आहे असे सांगुन दोन अनोळखी इसमांनी त्यांच इनोव्हा कार नंबर एमएच १४ जेपी ५६६६ हिचे मध्ये बसवून तु तुझा सर्व स्टाप घेऊन निघुन जायचे तु कॅन्टीन चालू ठेवले तर तुला गोळया घालीन असे बोलून फिर्यादी समोर कॅन्टीन मालक सागर पुजारी यास फोन करुन मी तुझ्या मॅनेजरला उचलले आहे. १५ मि .आत तु कंपनीला लेटर देऊन तू कंपनी सोडायची नाहीतर तेझे माणसाला ठार मारीण अशी धमकी देऊन फिर्यादीस एचपीचौक म्हांळुगे येथ सोडून पळून गेले तसेच या अगोदरचे कॉन्ट्रक्टर मला दर महिन्याला २५,०००/- रु. देत होते तु मला २५,०००/- रु.महीन्याला दे अशी खंडणी मागीतली बाबत चाकण पो.ठाणे (म्हांळुगे चौकी) गुरनं.१०२८/२०२१ भादवि.कलम ३६४(अ),३४१, ३८५,३४ प्रमाणे दोन अनोळखी इसमा विरुध्द गुन्हा नोंद करण्यात आलेला होता.

चाकण औदयोगिक परिसरातील अपहरण करुन खंडणी मागितलेचा गंभीर स्वरुपाचा गुन्हा असल्याने आरोपींना तात्काळ ताब्यात घेण्याबाबत मा.श्री.सुधीर हिरेमठ,पोलीस उपआयुक्त,गुन्हे, पिंपरी चिंचवड तसेच श्री .डॉ. प्रशांत अमृतकर, सपोआ.गुन्हे -१ यांनी गुन्हेशाखा -३ कडील वपोनि/शंकर बाबर यांना गुन्हयातील आरोपींना तात्काळ ताब्यात घेऊन सदरचा गुन्हा उघडकीस आणणेबाबत मार्गदर्शन व सुचना दिल्या होत्या

**श्री.डॉ. प्रशांत अमृतकर, सपोआ.गून्हे-१** यांना बातमीदारामार्फत खात्रीशीर बातमी मिळाली की,सदर गंभीर गुन्हा हा राहूल राजाराम कान्हूरकर व त्याचा साथीदार यांनी केला आहे. त्या नुसार त्यांनी गुन्हेशाखा युनिट-३ चे वपोनि/शंकर बाबर व पोउपनि/प्रसन्न ज-हाड, पोउपनि/गिरीष चामले यांना कळवून सदर आरोपी ताब्यात घेणेबाबत सुचना दिल्या त्यानुसार **पोशि/१९४० राजकुमार हनमंते** अपहरणातील/खंडणीतील आरोपी हा तळेगाव चौक चाकण येथे वाहनासह येत असल्याची खात्रीशिर बातमी मिळाल्याने पोउपनि/गिरीष चामले व पथकाने तळेगाव चौक चाकण येथे आरोपी व गुन्हयात वापरलेली इनोव्हा कार एमएच १४ जेपी ५६६६ कि.रु.२०,००,०००/- रु.ची कारसह ताब्यात घेऊन सदरचा आरोपी मुद्देमालासह म्हांळुगे पोलीस चौकीचे ताब्यात देण्यात आला आहे.

सदरची कार्यवाही ही मा. पोलीस आयुक्त.श्री कृष्ण प्रकाश, मा.अपर पोलीस आयुक्त. श्री रामनाथ पोकळे ,मा.पोलीस उपआयुक्त, गुन्हे श्री सुधीर हिरेमठ, मा. सहा.पोलीस आयुक्त .श्री प्रंशात अमृतकर यांचे मार्गदर्शनाखाली वपोनि, शंकर बाबर, पोउपनि/प्रसन्न ज-हाड, पोउपनि/गिरीष चामले,पोलीस अंमलदार, पोहवा/आढारी, पोहवा/सानप, पोहवा/चव्हाण, पोना/मोरे , पोना/भालचिम, पोशि/कोळकर, पोशि/हनमंते, पोशि/नांगरे, पोशि/बाळसराफ, पोशि/ढाकणे, पोशि/जैनक, पोशि/जाधव व पोहवा/आगलावे यांनी केली आहे.

**(सुधीर हिरेमठ)**
**पोलीस उप आयुक्त, गुन्हे**
**पिंपरी चिंचवड**